Vol 5 Issue7 April 2016

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

Ashok Yakkaldevi
A R Burla College, India

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

ISSN: 2249-894X    Impact Factor : 3.1402(UIF)    Volume - 5 | Issue - 7 | April - 2016

**Review Of Research**

# समाजाला नवीन दिशा देणारे स्वामी विवेकानंद

*कुणाल शिवशंकर वालोंदरे*
*एम.ए., (इतिहास), एम.ए. (राज्यशास्त्र) बी.एड.*
*नेट, (इतिहास), नागपूर.*



कुणाल शिवशंकर वालोंदरे

**सारांश –**

भारतात प्राचीन काळापासून ते आतापर्यंत मानवी जीवनात अनेक परिवर्तन घडून आले आहे. काळाच्या ओघात भारतीय जीवनात अनेक चांगल्या वाईट कल्पना, रुढ केल्या गेल्या. त्या टिकविण्यासाठी काहींनी प्रयत्न केले. तर काहींनी त्यात काळानुसार बदल करण्यासाठी प्रयत्न व संघर्ष केला.

## प्रस्तावना

एकोणिसाव्या शतकात भारतात वर्णव्यवस्थेतून निर्माण झालेली जाती व्यवस्था कडक बनली होती. रुढी, परंपरा व ग्रंथप्रामाण्य यांना सामाजात विशेष महत्व होते. यामुळे कनिष्ठ जातीतील लोकांना त्यांचा त्रास सहन करावा लागे. समाजामध्ये श्रेष्ठ–कनिष्ठपणा भेद मोठया प्रमाणावर होत होते. समाजात दुर्बल लोकांना मोठया प्रमाणावर अत्याचार होवू लागले. जाती प्रथामुळे माणसा–माणसात मोठया प्रमाणावर भेदभाव निर्माण झाला होता. जातीतील कर्मकांड व अंधश्रध्दामुळे समाजात विषमता निर्माण झाली होती. गरीब व दुर्बल लोकांवर मोठया प्रमाणात अन्याय व अत्याचार होत होते. अशा वेळी मनुष्य समाजाला कालपरत्वे नव्या साच्यात घालून नव्याने घडविण्याची आवश्यकता निर्माण होत होती आणि या असल्या प्रयोजनाच्या पूर्तीसाठी स्वामी विवेकानंद सारख्या महामानवांचे भारतीय समाजात आगमन झाले.



स्वामी विवेकानंदानी समाजातील कर्मकांड, रुढी, परंपरा अंधश्रध्दा, जातीभेद, भेदभाव आत्यंतिक ग्रंथप्रामाण्य यांचा विरोध केला. ज्यांनी जात व स्त्रीयांचा विकास करण्याकरीता समाजाला मार्गदर्शन केले. लोकामंध्ये शिक्षणाचे महत्व सांगितले. प्रत्यक्षात समाजाचा विकास व सामाजिक ऐकता याबाबत समाजातील प्रत्येक मानवांना जागृत केले. ''मानवाची सेवा हाच खरा धर्म आहे'' अशी शिकवण त्यांनी दिली. मानवतावाद व विश्वबंधूत्व या तत्वांचा पुरस्कार करुन समाजात एक नवीन चेतना निर्माण केली आणि भारतीय समाजांना नवीन दिशा दिली. प्रस्तूत लेखात स्वामी विवेकानंदानी भारतीय समाजाला एक नवीन दिशा दिली. हा दृष्टीकोन ठेवून अभ्यास करण्यात आला आहे.

## स्वामी विवेकानंद यांचे प्रारंभिक जीवन :–

12 जानेवारी 1863 रोजी कलकत्ता येथील सिमुलिया (सिमला) विभागात श्री. विश्वनाथ दत्त व भुवनेश्वरी देवी या माता–पितांच्या पोटी त्यांचा दिव्य जन्म झाला.[1] विवेकानंदाचे पूर्ण नांव नरेंद्रनाथ विश्वनाथ दत्त होते. त्यांचे वडील विश्वनाथ दत्त हे कोलकत्यांचे एक प्रसिध्द वकील होते. लहाणपणापासूनच स्वामी विवेकानंद अत्यंत धार्मिक प्रवृत्तीचे होते. तारुण्यात पदार्पण केल्यानंतर याच धर्मप्रेरणेमुळे ब्रम्हचर्याचे अंखड पालन, साधन–भजन आणि कठोर तपश्चर्या करण्यात ते मग्न झाले. कितीतरी रात्री ते झोपेविना ध्यान–साधनेत घालवत.

स्वामी विवेकानंदानी धर्मभावना दृढ व्हावी म्हणून त्यांनी ब्राम्हनसमाजात प्रवेश घेतला.[2] त्यांच्या मनात भिन्न प्रकारचे प्रश्न होते. देव खरचं आहे कि नाही ? असल्यास कोठे भेटेल ? असल्यास त्याची भेट कोण घडवूण देणार ? या सर्व विचारांनी त्यांचे मन अस्वस्त होत होते. ब्राम्हण समाजाचे देवेंद्र त्यांच्या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देऊ शकले नाही. त्यांची भेट रामकृष्ण परपमसं यांच्या सोबत झाली[3]. संत परमहसं हे पूढे, स्वामी विवेकानंदाचे गुरु व मार्गदर्शक बनले. रारमकृष्ण परमहंस यांनी स्वामी विवेकानंदा विषयी सत्य जगाला सांगितले. ''हा स्वामी विवेकानंद (नरेंद्र) मानव जातीच्या उध्दारासाठी जन्मलेला आहे, तो हिंदू धर्म आणि हिंदुस्थानाची मान साऱ्या जगात उंचावेल'' आणि पुढे हेच सत्यपण झाले.

सन 1881 साली डफ कॉलेजातून बी.ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांच्या वडीलांचा मृत्यू झाला. त्यानंतर नोकरी करुन घराचा भार उचलण्या ऐवजी त्यांनी सन्यास घेतला आणि आपले गुरु संत रामकृष्ण परमहंस यांच्या मठात राहून त्यांच्याकडून शिक्षा घेतली. रामकृष्ण यांनी संपूर्ण ज्ञान सर्व योग शक्ती स्वामी विवेकानंदाला दिली आणि हिंदूधर्म आणि तत्वज्ञान यांचा जगभर प्रसार करुण आपल्या राष्ट्राचा उध्दार कर असे स्वामी विवेकांना सांगितले. 15 ऑगष्ट 1886 रोजी रामकृष्ण परमहंस यांचे निधन झाले[4]. स्वामी विवेकानंदानी व इतर शिष्यांनी बडानगर येथे मठाची स्थापना केली. 11 सप्टेंबर 1893 मध्ये अमेरिकेतील शिकागो येथील सर्वधर्म परिक्षेत त्यांनी वेदांत तत्वज्ञान व हिंदू धर्माची सर्व समावेशकता या विषयावर आपले परखड विचार मांडले आणि संपूर्ण जगाला एक नवीन दिशा दिली[5].

### *स्त्री विषयी विचार :–*

स्वामी विवेकानंद म्हणतात स्त्रीयांना योग्य सन्मान देऊन सारे देश उन्नत झाले आहे. ज्या देशात स्त्रीयांचा सन्मान आणि विकास होत नाही, तो देश कधीच उन्नती करु शकत नाही[6]. स्त्रीयांच्या विकास झाल्याशिवाय भारताचा विकास होवू शकत नाही. विवेकानंद म्हणतात ''पक्ष्याला एकाच पंखाच्या साहायाने उडता येणार नाही. स़्त्रीयांची उन्नती झाली तरच भारत खऱ्याअर्थाने जागृत होईल.'' स्त्रीयांचा बौध्दीक विकासाबरोबर त्यांचा आध्यात्मिक व नीतीमत्वाचा विकास होणे आवश्यक आहे. स्त्रीयांना सुशिक्षीत करुन त्यांना आपले कार्य करण्याची स्वतंत्रता दिली पाहीजे जेणेकरुण, स्वतःच्या समस्या स्वतःच्या पध्दतीने सोडविण्याची क्षमता स्त्रीयांमध्ये विकसित झाली पाहीजे. सातीत्व व मात्तृत्व हे भारताचे आदर्श नजरेसमोर ठेवून स्त्रीयांमध्ये जागृती निर्माण केल्याने स्त्रीयांचा विकास होईल व भारताचे भविष्यही सूंदर बनेल.

### *शिक्षणाविषयी विचार :–*

भारत गुलामगिरीचे जीवन जगत असतांना सर्वसामान्य माणसाला शिक्षणच तारु शकेल. अशी त्यांची भुमिका होती. कोणत्याही देशाची उन्नती त्या देशाच्या शिक्षित व अशिक्षित लोकसंख्यावर अवलंबून असते भारत देश मागासलेला असल्यामुळे या देशात शहरी भागात मुठभर श्रीमंत लोक  शिक्षणाचे ज्ञान घेत आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक लोकापर्यंत शिक्षण रूपी ज्ञान आतापर्यंत पोहचले नव्हते. त्यासाठी प्रत्येक ग्रामीण भागातील शिक्षणाचा व्याप वाढविला पाहीजे आणि ग्रामीण भागातील शिक्षणापासून वंचीत असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण देऊन त्यांचा विकास केला पाहीजे. विवेकानंदांना अभिप्रेत असलेले शिक्षण केवळ पुस्तकी व माहिती संकलीत करणारे शिक्षण नाही तर चरीत्र घडविणारे माणसिक बळ वाढविणारे शिक्षण पाहीजे होते[7]. जे शिक्षण माणसाला परिपूर्णते कडे घेऊन जाते, ज्या शिक्षणाद्वारे ईच्छाशक्तीचा प्रवाह आणि अभिव्यक्ती हि आपल्या ताब्यात येतात आणि फलद्रुप होतात हेच खरे शिक्षण आहे. ज्या शिक्षणाने माणूस जीवनात आपल्या पायावर उभा राहू शकतो तेच खरे शिक्षण आहे. विवेकानंद पुरुषा बरोबर स्त्री शिक्षणाला सुध्दा समर्थक होते'. ते म्हणायचे कि स्त्रीया शिक्षणापासून उन्नत झाल्या तरच तुमच्या मुलाबाळाचे आणि देशाचे भविष्य उज्ज्वल होणार आणि तेंव्हाच देशात विद्या, ज्ञान, शक्ती, भक्तीची जागृती होणार.

### *धर्म व नितीमत्ताबद्दल विचार :–*

धर्म ही अशी वस्तू आहे कि जिच्यामुळे पशूचे मनुष्यात आणि मनुष्याचे ईश्वरात रुपांतर होते[9]. असे विवेकानंदाचे मत होते. धर्माचा मुळ उद्देश मानवाला सुखी करणे आहे, पण परजन्मी सुखी व्हावयाचे म्हणून या जन्मी दुःखी भोगत राहणे हे शहाणपनाचे लक्षण नाही. याच जन्मी हयाच क्षणापासुन सुखी झाले पाहीजे. ज्या धर्माच्या व्दारे हे साध्य होत असेल तोच आपल्यासाठी खरा धर्म आहे. धार्मिक विचाराबद्वल सांगतांना ते म्हणायचे ''जो केवळ प्रभू प्रभू'' म्हणून ओरडत राहतो. तो खरा धार्मिक नव्हे तर जो त्या प्रभूच्या ईच्छेनुसार कार्य करतो तो खरा धार्मिक होय[10]. धर्माचे रहस्य प्रत्यक्ष आचरणात आहे. शुल्क मतवादात नाही. आपण स्वतः चांगले राहीले आणि दुसऱ्याचे चांगले केले सगळा धर्म यातच साठला आहे. दुसऱ्याला पीडा न करता परोपकार करणे हा धर्म आहे. ईश्वर आणि स्वतःच्या आत्मावार विश्वास ठेवणे हा धर्म आहे. भेदा–भेद, वाद, क्रियाकांड, अनुष्ठाने, मंदीर या प्रत्यक्ष धर्म नाही. या सगळया बाहय पाहण्याच्या बाबी आहे. मनुष्याने अंतकरणातून चांगल्या मनातून, चांगले कर्म, मनातून देवाची उपासणा व चांगले ज्ञान आत्मसात करुन आपले कार्य केले यातच धर्म आहे. धर्म हा केवळ ग्रंथात, शब्दात किंवा मंत्रात साठलेला नाही, तो प्रत्येक माणसाच्या आत्मज्ञानात साठलेला आहे. धर्म म्हणजे केवळ पंडित नाही तर प्रत्यक्ष मनाला लाभलेला आत्मसाक्षात्कार आहे.

नीतीमत्ता बददल सांगतांना विवेकानंद म्हणतात, जे जे म्हणून स्वार्थ परी, ते ते नितीविरुध्द आणि जे निःस्वार्थपर तेच नीती संगत हो,[11]. नीतीमत्ता म्हणजे आधी इतरांचे आणि नंतर मागाहून माझे अशी आपली वृत्ती असली पाहीजे. मी सगहयात शेवटी यातच नीतीमत्ता आहे आणि नीतीमत्ताचे नियम त्यावरच आधारलेले आहे.

### *सामाजिक विचार :–*

स्वामी विवेकानंदानी समाजातील सुधारणांचा पुरस्कार केला. त्यांनी रुढी, परंपरा प्रथा यांना पाठींबा देणाऱ्या धर्मात काळापुरुप बदल झाला पाहीजे. याला महत्व दिले. स्वामी विवेकानंदानी धर्मग्रंथांच्या प्रामाण्याऐवजी नीतीमत्तेला व आत्माच्या उन्नतीला महत्व दिले. स्वामी विवेकानंदानी एकेश्वरवादाचा पुरस्कार केला आणि  मूर्तीपूजेला विरोध केला. त्यांनी शुध्द चरीत्र, वैश्विक समता, प्रेम, मानवता इत्यादी

मुल्यांना महत्व दिले. समाजामध्ये विवेकानिष्ठ धर्मविचार प्रस्थापीत व्हावा म्हणून त्यांनी 1 मे, 1897 रोजी बंगाल मध्ये ''रामकृष्ण मिशन'' संस्थाची स्थापना केली[12]. रामकृष्ण मिशन ही धार्मिक, आध्यात्मिक व मानवतावादी मिशन होती. या मिशनचे उद्देश लोकांना विवेकबुध्दीने धर्माचा अभ्यास आणि मानवाची सेवा हाच खरा धर्म आहे. हे जागृत करण्याचे काम होते. त्यांनी विधवा विवाहाचा समर्थन केला. त्यांनी वर्णव्यवस्थेचा विरोध केला. अस्पुश्यतेचा विरोध केला. लोकांना नररुपी नारायणाची सेवा करण्याचा मंत्र दिला. ते लोकांना म्हणायचे कि गोरगरीबांची सेवा करणे दिन–दुबळयांची सेवा व प्रेमाणे वागणे आणि अत्यंत आनंदाने त्यांची सेवा करावी यातच खरा धर्म आहे[13]. हिच परमेश्वराची सेवा आहे असे त्यांचे सामाजिक विचार होते.

### *मनाचा विकासाबद्दल विचार :–*

मनाची एकाग्रता जितकी अधिक तितके अधिक ज्ञान प्राप्त होईल. कारण ज्ञानप्राप्तीचा हाच एकमेव उपाय आहे. बाहय व आंतर जगाचे आपल्याला असलेले सारे ज्ञान केवळ एका पध्दतीने मानाच्या एकाग्रतेने मिळविले आहे. आपल्याजर जर आपले मन कोणत्याही विषयावर एकाग्र करता आले नाही. तर आपल्याला कुठल्याही शास्त्राचे ज्ञान प्राप्त करता येणार नाही. मानाच्या एकाग्रतेच्या कमी–अधिकपणामुळे या जगात माणसामाणसात फरक आढळून येतो. एका माणसाचे मन दुसऱ्याच्या मनाहून अधिक एकाग्र असल्यामुळे तो दुसऱ्या पेक्षा अधिक ज्ञान प्राप्त करुन घेतो. संयम ठेवून मनाचा विकास करा. त्यानंतर जे कार्य करायचे असेल तेच करा त्यांचा फायदा लवकर मिळेल. जितके मन अधिक शुध्द, तितका त्यांचा संयम अधिक सोपा जातो. समान्य माणसाचे कार्य असो या श्रीमंत माणसाचे कार्य असो, धनार्जनांचे कार्य असो, या ईश्वर उपासना असो किंवा दुसरे कोणतेही कार्य असो, मनाची एकाग्रता अधिक तितके ते काम चांगल्या प्रकारे होते. प्रकृतीचे दरवाजे उघडून त्यामूधन ज्ञान प्रकाशाचा झोत प्राप्त करुन घेण्याचा हाच उपाय आहे[14]. आपली मनोवृत्ती जशी असेल तसे आपलयाला जग दिसते. आपले मनाचे विचार वस्तूंना सुंदर बनवितात, आपले विचार त्यांना कुरुप बनवितात सारे जग आपल्या मनात आहे. वस्तुंकडे योग्य दृष्टीने पहावयास शिका असे विवेकानंदानी म्हणाले.

### *जनतेला जागृत करण्याबद्दल विचार :–*

विवेकानंदांना सामान्य माणसाच्या शक्तीवर पूर्ण विश्वास होता. त्यांना माहित होते की, जोपर्यंत सामान्य जनता, समाजातील प्रत्येक एक व्यक्ती जागृत होत नाही, तोपर्यंत भारतीय समाजात सामाजिक विषमता बनत राहील. मुठभर श्रीमंत व्यापारी आणि जमीनदार लोक गरीब दूर्बल लोकांवर अत्याचार करीत आहे, हे गरीब दूर्बल सामान्य जनता जागृत झाली तर त्यांच्यावर होणारा अन्याय त्यांना स्वतः समजून येईल व ते त्याचा प्रतिकार करतील. विवेकानंदांना भारतातील जातीव्यवस्था, भेदा–भेद अस्पृश्यता मान्य नव्हता. ते या व्यवस्थेचा विरोध करीत होते. गरीब दूर्बल अस्पृश्य लोकांना जागृत करुन त्यांचा विकास करुन उच्च श्रीमंत लोकांच्या बरोबरीत आणायचे होते. स्वामी विवेकानंद म्हणतात भारतात समाजाची सुधारणा करण्यासाठी त्यांच्या मध्ये जागृती निर्माण करण्याठी धर्म क्रांती होणे आवश्यक आहे. धर्म समाजातील प्रत्येक लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करेन. राष्ट्रीय स्वामीभान निर्माण करेल, सर्वत्र दुरवर पसरलेलया लोकांचे दैन्य, दुःख, कष्ट दुर करण्याची शक्ती लोकांना देईल आणि त्यांच्यामध्ये जागृती निर्माण होईल व भारताचा भविष्यात विकास होईल.

अशाप्रकारे स्वामी विवेकानंदाचे विचार, निराश, दूर्बल, गरीब, अज्ञानी सामान्य माणसाच्या मनात अशा विश्वास आणि उत्साह निर्माण करतात. त्यांच्यात मोठया प्रमाणात साहस निर्माण करतात आणि आपल्या कार्याच्या लक्षापर्यंत पोहचविण्यासाठी व ते लक्ष्य प्राप्त होण्यासाठी प्रेरणा देण्याचे काम करीत आहे. विवेकानंदाच्या विचारांमुळे गुलामगिरीत असलेल्या भारताला स्वातंत्र प्राप्त करण्यासाठी एक नवीन मार्ग भारतीय जनतेला मिळाले आणि भारतीय जनतेमध्ये सामाजिक चेतना निर्माण होवून एक समृध्द भारत निर्माण करण्यासाठी एक नवीन चेतना मिळाली.

अशा महान व्यक्तीमत्व असणाऱ्या स्वामी विवेकानंद यांनी वयाच्या अवघ्या 40 व्या वर्षी 4 जुलै 1902 रोजी महासमाधी घेतली आणि महत्वाचे म्हणजे महासमाधी घेण्याची तारीख आणि दिवस त्यांनी स्वतः निश्चित केला होता.

### *निष्कर्ष :–*

स्वामी विवेकानंदानी संपूर्ण भारताला नाही तर जगाला एक चेतना दिली. नवीन मार्ग दाखविला, विश्वबंधूत्वभावाचा मार्ग दाखविला. मानवतावाद, नीतीमत्ता आणि प्रत्येक माणसाच्या आत्म्याची शुध्दी यावर त्यांनी भर दिला. समाजात परीवर्तन घडविण्यासाठी त्यांनी स्त्रीला महत्वाचे स्थान दिले. शिक्षणामुळे बौध्दीक विकास होतो. सोबत प्रत्येक माणसाचे चरित्र घडविण्यासाठी मानसिक बळ देण्याचे काम शिक्षण करते. हे त्यांनी सांगितले. धर्म आत्मविश्वास निर्माण करतो. राष्ट्रीयभावना निर्माण करतो आणि खरा धर्म मानवाची सेवा करण्यात आहे यावर त्यांनी भर दिला. जातीभेद वर्णव्यवस्था, अस्पृश्यता, यांचा त्यांनी विरोध केला. ज्ञान प्राप्ती करण्यासाठी त्यांनी मनाची एकाग्रता निर्माण करायला सांगितले. समाजातील प्रत्येक व्यक्तीला जागृत करायला त्यांनी सांगितले.

या स्वामी विवेकानंदाच्या विचारामुळे समाजातील प्रत्येक एक व्यक्तीला नवीन दिशा मिळाली आहे आणि त्यांच्या या विचारांचा प्रभाव वर्तमानातही मोठया प्रमाणात प्रत्यक्ष प्रभावित करीत आहे आणि समाजाला एक नवीन दिशा देण्याचे काम करीत आहे.

### *संदर्भ सूची :–*

1.पेंडसे, वि.वि., राष्ट्रद्रष्टे विवेकानंद पृ.6 प्रकाशन – 1958–59
2.अपूर्वानंद, स्वामी, स्वामी विवेकानंद संक्षिप्त चरीत्र आणि उपदेश पृ.10, प्रकाशन 1986.
3.अपूर्वानंद स्वामी, स्वामी विवेकानंद संक्षिप्त चरीत्र आणि उपदेश पृ.11, प्रकाशन–1986.
4.मुजुमदार सत्येंद्रनाथ, स्वामी विवेकानंद यांचे चरीत्र पृ. 81, प्रकाशन–2000.
5.व्योमरुपानंद स्वामी, स्वामी विवेकानंद – राष्ट्राला आवाहन, पृ.10, प्रकाशन–1985

6.अपूर्वानंद स्वामी, स्वामी विवेकानंद संक्षिप्त चरीत्र आणि उपदेश, पृ.89, प्रकाशन : 1986
7.व्योमरुपानंद स्वामी, स्वामी विवेकानंद – राष्ट्राला आवाहन, पृ.40, प्रकाशन–1985
8.अपूर्वानंद स्वामी, स्वामी विवेकानंद संक्षिप्त चरीत्र आणि उपदेश, पृ.86, प्रकाशन : 1986
9.व्योमरुपानंद स्वामी, स्वामी विवेकानंद – राष्ट्राला आवाहन, पृ.54, प्रकाशन–1985
10.व्योमरुपानंद स्वामी, स्वामी विवेकानंद – राष्ट्राला आवाहन, पृ.56, प्रकाशन–1985
11.व्योमरुपानंद स्वामी, स्वामी विवेकानंद – राष्ट्राला आवाहन, पृ.59, प्रकाशन–1985
12.पेंडसे, वि.वि., राष्ट्रद्रष्टे विवेकानंद पृ.246 प्रकाशन – 1958–59
13.अपूर्वानंद स्वामी, स्वामी विवेकानंद संक्षिप्त चरीत्र आणि उपदेश, पृ.35, प्रकाशन : 1986
14.व्योमरुपानंद स्वामी, स्वामी विवेकानंद – राष्ट्राला आवाहन, पृ.26, प्रकाशन–1985

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org